**प्रेसनोट दि.२६/०४/२०१९**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे**

**विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी कोंढवा पोलीस ठाणे येथे शिबीर आयोजित केले बाबत.**

दिनांक २६/४/२०१९ रोजी १७.०० वा. ते १८.०० वा.च्या दरम्यान कोंढवा पोलीस ठाणे या ठिकाणी लाईफ स्कुल" व "किप मुव्हींग मुमेंन्टस" या एन.जी.ओ. तर्फे कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतील विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी शिबीर आयोजीत करण्यात आले होते.

सदर शिबीरामध्ये "लाईफ स्कुल फौडेशनचे " संस्थापक :- श्री नरेंद्र गायदाने, व किप मुव्हींग मुव्हमेंन्टस चे अमित वर्धे ,निरज गोईदाणी, मीना मुंदडा, विरल मेहता, व हर्षद दोषी यांनी विधी संघर्ष ग्रस्त बालक व त्यांचे पालक यांना आयुष्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोण ठेवून झालेला चुकांमधून पुन्हा नव्याने आयुष्य सुरु करण्याबाबत मार्गदर्शन केले.

सदर शिबीरामध्ये कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अनिल पाटील यांनी विधीसंघर्षग्रस्त बालकांना मार्गदर्शन केले. व पोलीस निरीक्षक गुन्हे महादेव कुंभार यांनी वरिल एन जी ओ यांनी सदरचा कार्यक्रम आयोजित केले बाबत आभार मानले आहेत. सदरच्या कार्यक्रमासाठी विधीसंघर्षग्रस्त बालक , त्यांचे पालक व इतर असे एकूण ६० ते ७० बालक-पालक उपस्थित होते.



**(अनिल पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर**